
ISSN : 2393-8900

# Historicity

International Research Journal

Volume - 5 | Issue - 11 | July - 2019
Impact Factor : 2.7825(UIF)



Editor-In-Chief
Dr. Sanjay Gaikwad

HISTORICITY RESEARCH JOURNAL
ISSN NO:- 2393-8900
Vol- 5| Issue 11 |July -2019

## Contents

"महाराष्ट्राची लोकगीत परंपरा"

1 इ.स. 1857 च्या उठावात महाराष्ट्राचे योगदान–एक संक्षिप्त अध्ययन
प्रा.डॉ.जगदिश दयासागर हेंडवे

7 ''महाराष्ट्राची लोकगीत परंपरा''
प्रा.प्रशांत चौधरी

17 A RARE PAINTED MANUSCRIPT OF 'SHRIMADBHAGVATA' PURANA
Mansi Khati and Radhesh R. Kulkarni

21 HERO STONES IN MADKAI, PONDA-GOA
Nalini Naik

27 भारतीय निवडूकीमधील प्रसार माध्यमांचा भूमिका
प्रा. राहुल बी. सोनवणे

30 आजच्या जागतिकीकरणाच्या काळात म. गांधीच्या विचारांची प्रासंगिकता
प्रा.डॉ.वानखेडे उमाकांत ज्ञानोबा

33 महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या आणि उपाय
प्रा.डॉ. देवकाते बी. एन.

ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "महाराष्ट्राची लोकगीत परंपरा"



प्रा.प्रशांत चौधरी
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद.

## प्रस्तावना :—

प्रस्तूत शोध निबंधात मराठी लोकभाषा व संस्कृतीमधील विविध लोकगीत प्रकारांचा तौलनिक व रसग्रहणात्मक अभ्यास अभ्यास केला आहे.

या अभ्यासातून आपले वैभवशाली लोकसाहित्य परंपरेचे स्मरण व संवर्धन करणे हा प्रमुख हेतू आहे. आजच्या काळात विविध कारणांनी आपल्या या लोकपरंपरा लुप्त होण्याची भीती वर्तविली जात असते. या पार्श्वभूमीवर विचार करता प्रस्तूत अभ्यास करणे आवश्यक वाटते.

## मंगळागौर :—

मंगळागौर म्हटलं की साऱ्या सासूरवाशिणींच्या मनात माहेरची ओढ निर्माण होत असते. काळ कोणताही असो, जुना किंवा आत्ताचा. प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात मंगळागौरीचा आनंद काही वेगळाच असतो. ही मंगळागौर म्हणजे आहे तरी काय? या सणाचं नेमकं काय महत्व आहे, याची अनेकांना उत्सुकता असते.

'मंगळागौर' हे पवित्र व्रत आहे. हा सण नवविवाहीत स्त्रीसाठी एक आनंदाचे पर्व असते. लग्नानंतर पहिली पाच वर्षे स्त्रीया मंगळागौरीचं पूजन करतात. हे पूजन श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी होते. यासाठी १६ प्रकारच्या पत्रींची आणि फुलांची आवश्यकता असते. ही माहिती तर आपणाला चातुर्मासाच्या पुस्तकातून उपलब्ध होतेच, पण ज्या काळात मुलींची लहान वयात लग्न होत असत त्या काळात त्यांना माहेरी आणण्यासाठीची सुवर्णसंधी म्हणजे मंगळागौर. लेकीला थाटात सासरी आणून तिचं कोडकौतुक करायाची ओढ जशी आईवडीलांना तशीच माहेरपणाचा आनंद घेण्याची आणि आपल्या मैत्रिणींसोबत धमाल धिंगाणा करण्याची ओढ त्या मुलीच्या मनात अव्याहतपणे असते.

दिवसभर मंगळागौरीची पूजा आणि रात्री मंगळागौरीचा जागर. या जागरात अनेक प्रकारचे खेळ आणि गाणी होतात. तसेच उखाण्यांचे कार्यक्रमही होतात.

अल्लड वयात लग्न होऊन सासरी संसाराच्या गाड्यात अडकलेल्या मुलीचा सारा ताण—तणाव या मंगळागौरीच्या पूजन आणि जागर यातून कमी होत असे. तसेच अखंड सौभाग्य मागण्यासाठी आपण केलेल्या व्रताचा आनंदही तिला प्राप्त होत असे. असे सुंदर स्वरूप मंगळागौरीचे आहे.

## आरती

मंगळागौरीची आरती म्हणजे या मंगळागौरीच्या पूजाविधीमधील जी कहाणी सांगितली जाते त्या कहाणीचा सारांश होय. त्याच बरोबर या आरतीमध्ये मंगळागौरीच्या पूजेसाठी जी जी फुले, पत्री आणि सामग्री लागते, त्याचीही माहिती या आरतीतून मिळते. मन एकाग्र करून ही आरती ऐकताना मनाला एक

वेगळेच समाधान प्राप्त होते. आणि आत्मिक प्रसन्नतेचा अनुभव अनुभवयास मिळतो. अशी मंगळागौरीची आरती.

जयदेवी मंगळा गौरी।
ओवाळू सोनिया ताटी।
रत्नांचे दिवे माणकाच्या वाती।
हिरे या जोती जयदेवी मंगळा गौरी ।धृ।।
मंगळमूर्ती उपजली कार्या।
प्रसन्न झाली अल्पायुषी राया।
तिष्ठली राज्यबाळी।
आयोपण द्यावया।।जय ।।१ ।।
पूजेला सोळा परींची पत्री।
जाई जुई आबुल्या शेवंती नागचाफे।
पारिजातकें मनोहरें।
गोकर्ण महाफुलें नंदेटे तगरें।
पूजेला गं आणिली ।।जय ।।२ ।।
साळीचे तांदूळ मुगाची डाळ।
आळणीं खिचडी रांधिती नारी।
आपुल्या पतीलागीं सेवा करिती फार।।जय ।।३ ।।
डुमडुमें डुमडुमें वाजंत्री वाजती।
कळाबी कांकणे गौरीला शोभती।
शोभती बाजुबंद।
कानीं कापांचे गवे।
ल्यायिली अंबा शोभे।।जय ।।४।।
न्हाऊनी माखुनी मैनी बैसली।
षाटावाची चोळी क्षीरोपदक नेसली।
ताटीं घातिल्या पंचारती
मध्ये उजळती कापुराच्या वाती।।जय ।।५।।
सोनिया करा धूप दिप।
आता नैवेद्य षड्रस पक्वान्ने।
ताटी भरा बोनें।। जय ।। ६।।
लवलाहे तिघें काशीसी निघाली।
माऊली मंगळागौरी भिजवूं विसरली।
मागुती परतुनिया आली।
अंबा स्वयंभू देखिली।
देऊळ सोनियाचे।
खांब हिरेयांचे।
कळस वरती मोतियांचा।

जय देवी जय मंगळा गौरी ओवाळीन सोनिया ताटी।। ७।।

**इतर खेळ व गाणी**

मंगळागौरीचे पूजन झाले की, इतर खेळांना रंगत येत असते. नववधूच्या साऱ्या मैत्रिणी मिळून वेगवेगळे खेळ खेळातात. त्यात अनेक प्रकारच्या म्हणजे साधारण २१ ते २२ प्रकारच्या फुगड्या, आगोटा–पागोटा या खेळाचे सुमारे ५–६ प्रकार, झिम्म्याचे अनेक प्रकार, लाटा, साळूंकी, गोफ, गाटोडे, पिंगा या प्रकारात मैत्रिणींनी एकमेकींना चिडवणे, लटके भांडण करणे आणि स्वतःची खोटी–खोटी खेळातील फुशारकीपण मारणे, अशा विविध खेळांचा समावेश होतो. तसेच सासू सुनांचे भांडण, विहिणी–विहिणींमधील भांडण, सवती–सवतींचे भांडण यांचा ही समावेश या खेळांमध्ये होतो.

सासरी नवखी असलेली वधू माहेरी येताच तिला आलेल्या नवीन अनुभवांचा खजीना आपल्या मैत्रिणींना खुला करून देते. तिच्या नवेपणामुळे तिला सासरी व्यक्त न करता आलेल्या सर्व भावनांना ती या खेळांच्या माध्यमातून मोकळी वाट करून देत असते.

मंगळागौर ही श्रवणात असते. परंतु, चातुर्मासाची सुरूवात होताच म्हणजे आषाढी एकादशीपासूनच गृहिणी या सणाची वाट पहात असतात. मातापिता हे आपली मुलगी माहेरी येणार म्हणून वाट पाहतात, तर मुली आपल्याला माहेरी जायचे या आनंदात तल्लीन असतात. याच आशयाचं हे गीत :

आषाढ मासी एकादशी।
श्रावण पंचमी कोण्या दिवशी।
श्रावण पंचमी कोण्या दिवशी साजणे बाई—–
आगं या पंचमीची लाही
नव वधूची झाली घाई साजणे बाई —–
मंगळागवर आली बाई साजणे बाई

या मंगळागौरीची वाट पहात असताना ही नववधू आकाशतल्या पाखरांना आपल्या मानाची अधीरता सांगते, आणि आपल्या माहेरी जाऊन तिथली खबरबात विचारून यायला सांगते. यांतून तिची माहेरची ओढ दिसून येते.

चलबदल
हं हं हं हं
रूणझूणत्या पाखरा हं हं हं हं
जा रे माझ्या माहेरा हं हं हं हं
आली गवराई अंगणी तिला लिंब लोण करा
लेक बोलते लाडकी मला माहेरी पाठवा माय माऊली भेटवा
तिच्या काळजात वाहे माया ममतेचा झरा
रूणझुणत्या पाखरा—– आली गवराई अंगणी —–

लेक माहेरी येणार म्हणून आईची लगबग सुरू आहे. लेक जावाई जेवायचे म्हणून स्वतःच्या हाताने मोत्यासारखे तांदूळ सडायचे आहेत आणि तिला आणायला सोन्याची पालखी पाठवायची आहे. हा आनंद सोहळा पार पाडताना काय करावे आणि काय करू नये असे या माऊलीला झाले आहे.

तांदूळ सडू बाई तांदूळ सडू
मंगळा गौरीचे तांदूळ सडू
तांदूळ आमचे मोत्याचे लेक जावई जेवायचे
लेक आहे लाडकी आणा सोन्याची पालखी

VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 201

तांदूळ सडू बाई तांदूळ सडू मंगळा गवरीचे तांदूळ सडू

**जागर :—** आतुरतेनं वाट पाहून एकदाची मंगळागौर आली, तिचे पूजन झाले. आता साऱ्या मैत्रिणी जम या मंगळागौरीचा जागर करण्याची वेळ आलेली आहे. तिन्ही सांजेलाच सर्व नवविवाहिता आणि त्यांच्या सख्या नटून थटून नऊवारी नेसून नाकातल्या नथी सावरत अंगणात जागरणासाठी सज्ज झाल्या आहेत.

**चाल बदल**
जागवा जागवा गवर माझी जागवा
गवर माझी जागू दे गवर माझी नाचू दे
नावा वरती नाचू दे नावा वरती नाचू दे

**उखाणे :—** जागरण तर सुरू झालं, पण या साऱ्याजणी आपापल्या पतिदेवांना दूर ठेऊन इथे एकत्र मज करत आहेत. त्यामुळे त्यांना त्यांची आठवण आल्याशिवाय राहणार नाही, हेही खरंय. आणि मग उत्साह उखाणेही सुरू होतात. खरंतर स्वत:ला उखाणा घ्यायचा असतो, पण आधी आग्रह होतो इतरांना! विशेष नववधूला.

नाव घे नाव घे नाव घे
नाव घे धन्याचं धन्याचं धन्याचं

आणि तिही उत्साहाच्या भरात उखाणा घेते तो असा :

'मी आहे साधी वापरते खादी
रावांचं नाव घेते सर्वांच्या आधी'
(हॅऽऽ हॅऽऽ हॅऽऽ सर्वांचे हास्य)

**झिम्मा :—** जागरण अगदी भरात येतं आणि त्या नववधूच्या आईला ते भरलेलं अंगण मोहर टाकत असतं. तिच्या शेजारणी पाजारणींना गोळा करून हा सोहळा दाखवताना तिला भरून येतं. तेव्ह तिला तिच्या मैत्रिणी विचारतात की तुझं मन असं कावरंबावरं का झालंय :

**चालबदल**
गौरीमध्ये गवर मंगळागवरं
चला गं मंगळागौरीचा या करूया जागरं
आयांनो या गं बायांनो शेजारणींनो या गं या
फुलून आलंय आंगण बाई झिम्यानं धरलंय रिंगण
चल गं माझ्या मैतरणी माहेरवाशीन गडणी
कशानं मन हे झालं गं कावरं बावरं
चला गं मंगळागौरीचा या करूया जागरं

लाडाची लेक झिम्मा खेळता खेळता आपल्या सासरची गोकुळाशी तुलना करतेय आपल्या पहिल्या बाळाचं कौतुक ती तोंड भरून करतेय.

**चालबदल**
बारा घरच्या बायका एका जागी गं मिळू या
चला झिम्मा खेळू या गं चला झिम्मा खेळू या
लेक बोलते लाडकी

घरी गोकुळ साजणी
वसुदेव देवकीचा कान्हा खेळ खेळती अंगणी
चला झिम्मा खेळू गं चला झिम्मा खेळू या
लेक बोलते लाडकी
घरी गोकुळ साजणी
वसुदेव देवकीचा कान्हा खेळ खेळती अंगणी
बाळ नवसाचं माझं
त्याची दृष्ट गं काढू या
चला झिम्मा खेळूया गं चला झिम्मा खेळू या

**चालबदल**
आंबा पिकतो रस गळतो कोकणचा राजा बाई झिम्मा खेळतो
झिम पोरी झिम कपाळाचा भिंग भिंग गेलं फुटून पोरी आल्या नटून
पोरीत पोरी गोरी पोरी तूच काळी
आंबा पिकतो रस गळतो कोकणचा राजा बाई झिम्मा खेळतो

फसवा–फुगवा : खरं तर माहेरवाशिणीसोबतची तिच्या सासरचा वेढा असतो, तरी ती आपल्या सासरच्या विश्वातून बाहेर पडलेली नसतेच! मग ती आपण फसली तर आपली सासूच काढायला सासरची मंडळी काय काय करतील ते ध्यान ठेवून वागू लागते.

**चालबदल**
सासूरवाशी सून रुसून बसली कैसी
यादवराया राणी रुसून बसली कैसी
सासू गेली समजावयाला
चला सून बाई आपल्या घराला
अर्धा संसार देते तुजला
अर्धा संसार नकोच मजला
नकोऽऽ? हूं...!
सासूरवाशी सून रुसून बसली कैसी
यादव राया राणी रुसून बसली कैसी
नणंद गेली समजावयाला
चला वहिनी आपल्या घराला
सासूच सांगेल गं दादाला
असली सासूच नकोच मजला
नकोऽऽ! हूं...!
फसवा फुगवा नवरीचा नोकर चाकर
चला मंगळागौरीचा या करूया जागर

खुर्ची का मिर्ची :– हा एक मंगळागौरीचा आगगतला सुंदर खेळ आहे. हा खेळ खेळतानाचे हे पुढील गीत सासऱ्याच्या अधिकाराचे महत्त्व सांगते. या गाण्यामुळे तिचा संसार सांभाळण्यासाठी काही सूचना देते. सासऱ्यांवर सासरची पाखर करून त्यांच्या मनात शिरकाव करीत मन जिंकता येते हेच तिला समजावले जाते.

चालबदल
खुर्ची का मिर्ची, खुर्ची का मिर्ची, खुर्ची का मिर्ची——
खुर्ची का मिर्ची मिर्ची गं जाशील कैसी तू
खेळ खेळता खेळात हरशील कैशी तू
ओटी अंबेनी अंबेनी भरशील कैशी तू
वाण पदरात परात घेशील कैशी तू
सांभाळ आपलं कुंकू गं माल मायेची पाखर
चलागं मंगळागौरीचा या करूया जागरं

**घागर घुमू दे :–** या नवविवाहितेसाठी माहेरच्या साऱ्यांनी मागीतलेलं दान म्हणजेच 'घुमू दे घागर' हे होय. संसाराच्या खेळात या सासूरवाशीणीचा जीव पूर्णपणे रंगू दे, असं वरदान तिच्यासाठी मागीतलं जात

चालबदल
घुमू दे घागरं घुमूदे खेळांत जीव ह्यो रमू दे
घडंनं घागर झाकतीया म्हागं नं म्होरं झुकतीया
नाचून बाई माझी दमू दे खेळात जीव ह्यो रमू दे
घुमूदे घागरं घुमू दे खेळात जीव ह्यो रमू दे
(ए असं नाही अं आता अशी घागर घूमवायची – गद्य विभाग)

चालबदल
घागरं घुमूदे घुमूदे रामा पावा वाजू दे
हं हं हं हं
आला शंकरू बा शंकरूबा
गवर माझी लाजू दे
हं हं हं हं

**नाच गं घूमा :–** संसाराच्या तालावर नाचण्याचं कसब सगळेच जण तिला शिकवतायत पण तीही का कमी नाहीत्र कोणतं ना कोणतं कारण सांगून ती नाचायचं टाळतंच आहे. या आशयाचं हे सुंदर गीत :

चालबदल
नाच गं घूमा कशी नाचू, नाच गं घूमा कशी मी नाचू
या गावचा त्या गावचा कासार नाही आला बांगडी नाही मला
कशी मी नाचू गं घूमा कशी मी नाचू
या गावचा त्या गावचा सोनार नाही आला जोडवी नाही मला
कशी मी नाचू नाच गं घूमा
या गावचा त्या गावचा शिंपी नाही आला चोळी नाही मला
कशी मी नाचू गाच गं घूमा
नाच गं घूमा कशी मी नाचू

**काटवट कणा :–** या खेळातून संसारातील चक्रातलं जंतर मंतर (चढउतार) ऐकायला मिळातात. सासरं, दीर, नणंदा या साऱ्यांच्या फेऱ्या या खेळातून दाखवल्या जातात.

VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

चालबदल

कातवट कणा कातवट कणा खेळात रमल्या लेकी सूना
ही फेरी गं सासूची — हं हं हं हं
ही फेरी सासऱ्याची — हं हं हं हं
दीराची नणंदेची — हं हं हं हं
ही खेळी नवऱ्याची — हं हं हं हं
संसाराच्या चक्रात जंतर मंतर
चलागं मंगळा गौरीचा या करूया जागर

फुगडी :— मैत्रिणीचा हात हातात धरून वाऱ्याच्या वेगानं फिरताना साऱ्या जगाचा विसर पाडणारी 'फुगडी' हा सर्वच महिलांचा एक आवडता खेळ आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे या फुगडीचे साधारण २१ — २२ प्रकार पडतात. घसर फुगडी, घोळा फुगडी, एका पायाची फुगडी, दंड फुगडी, बस फुगडी, कमळ फुगडी हे या पैकी काही प्रकार आहेत.

चालबदल

फु बाई फु फुगडी चमचम करतीया बुगडी
फु बाई फु फुगडी फु गी नाय तू बाई मी नाय तू
घसर फुगडी घोळा फुगडी फुगडीचा धिंगाणा
फुगडीचा धींगाणा ग बाई पिंग्या चा पिंगाणा

पिंगा :— पिंगा घालणे म्हणजे एखाद्या भोवती गोल फिरणे. या खेळात कमरेवर हात ठेऊन स्वतः भोवतीच पिंगा घातला जातो. आपल्या अवती—भोवतीच्या

पिंगा गं पोरी पिंगा गं पोरी पिंगा गं
तुझ्या पिंग्या नं मला बोलवली रात जागवली पोरी पिंगा
फेटा बांधलेला भाऊ माझा गं जावाई तुझां गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्या नं मला बोलवली रात जागवंली पोरी पिंगा
शालू नेसलेली बहिण माझी गं सून तूझी गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलवली रात जागवली पोरी पिंगा
भाऊ माझा गं सोबराचा आंग जा जा गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलवली रात भूलवली पोरी पिंगा
तुझ्या भावाचं डोळं चकणं गं रूप हेकणं गं पोरी पिंगा
बहिण माझी गं लेक इंद्राची कोर चंद्राची पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलवंली जात जागवली पोरी पिंगा
तुझ्या बहिणीचं नाक नकटं गं तोंड चपट गं पोरी पिंगा
भाऊ तुझा गं भितो झुरळाला काळ्या उंदराला पोरी पिंगा
बहिण माझी गाते मंजूळ जणू कोकीळ पोरी पिंगा
तुझ्या बहिणीचं काय नरडं गं कावळा वरडं गं पोरी पिंगा
अशा बहिणीला कोण आणणार कशी नांदणार पोरी पिंगा
बहिण माझी गं जाई बावरून मेई सावरून पोरी पिंगा
तुझ्या बहिण्याचं मला बोलावलं लुगडं नेसवलं पोरी पिंगा

मागं — कागं :— या खेळात नववधूला आपल्या सासरच्यांशी कसे वागू नये हे सांगितले जाते. याचं स्वरूप लुटूपुटूचं रागावणं असं असतं.

चालबदल
का गं कागं कागं
दिलं वचन मोडतेस कागं
का गं कागं कागं
सासूशी भांडतेस कागं
कागं कागं कागं
तोंडी पतीच्या लागतेस कागं
कागं कागं कागं
भर्ताराचा स्वभाव जसा भोळा की शंकर
चला गं मंगळा गवरीचा या करूया जागरं

सासरी मुलीचं तिच्या नवऱ्याशी वागणं आणि घरातल्या इतर मंडळींशी वागणं यात तफावत नये याची जाणीव तिला खेळातून करून दिली जाते.

चालबदल
सासूबाईचं धूणं खूसू खूसू खूसू
जाऊबाईचं धूणं खूसू खूसू खूसू
आणि यांचचं धूणं धप धप धप
नणंदेचं धूणं खूसू खूसू खूसू
दीराचं धुणं खूसू खूसू खूसू
आणि यांच धूणं धप धप धप

**गाडा** :— सर्व सख्या मैत्रिणीच्या सासूला तिला खेळावयास पाठवण्याची विनंती करतात. या गण्य आणि खेळातून मुलींना माहेरचा मोकळेपणा आणि सासरची बंधनं यातील तफावत जाणीव करून दि जाते.

चालबदल
सोमू गोमूचा गाडा सासूबाई सूनेला धाडा
सोमू गोमूचा गाडा आतातरी लवकर सोडा
सई बाईचा कोंबडा आला माझ्या दारी
घालीन चारा पाजीन पाणी
सई बाईचा कोंबडा आहे मोठा लठ्ठ
खाऊन करीन फस्त
कू कू कू कू

**हटूश—नटूश** :— या खेळातून सासरच्या माणसांच्या स्वभावाचं वर्णन करताना सासूरवाशीणीला आपल सासरच्यांच्या स्वभावात फक्त चोमडेपणा, कुच्चरपणा, खडूसपणा असेच दुर्गुण दिसून येतात. त्यांच्यातले चांगले गुणही पहावयास तिला शिकवले जाते.

हटूश पान बाई हटूश
हटूश पान बाई हटूश
गोट तोडे कुणाला
काळ्या बुगड्या कुणाला
हटूश पान बाई हटूश
हटूश पान बाई हटूश

गोट तोडे घालू बाई नटूश
काजळ घालू नटूश
चोमड्या त्या नंदेला
कुच्चर जाऊबाईला
गोट तोडे घलू बाई नटूश
गोट तोडे घलू बाई नटूश

**सासू–सुनेचं भांडण :–** मंगळागौरीच्या खेळापैकी हा सर्वांच्या आकर्षणाचा खेळ आहे. खटूयाळ सून आपल्या सासूच्या पाटल्या, चंद्रहार, पैठणी हे सारं काही माहेरच्यांना देते. आणि त्यावरून हे भांडण आहे.

खरं पाहिलं तर या खेळातून आपल्या माहेरच्यांसाठी जे जे शक्य होईल ते ते करण्याची या सासूरवाशीणीची इच्छा व्यक्त होत असते. माहेरच्यांबद्दलच्या तिच्या मनातल्या भावना या गाण्यातून व्यक्त होत असतात.

आगं सून बाई काय म्हणता सासूबाई
माझ्या पाटल्या काय गं केल्या काय गं केल्या
आगं आगं सूनबाई काय म्हणता सासू बाई
माझा चंद्रहार काय केला काय गं केला
दादाच्या बायकोला घालायला दिला घालायला दिला
आगं आगं सून बाई काय म्हणता सासू बाई
माझी पैठणी काय गं केली काय केली
आई आली म्हणून नेसायला दिली
आगं आगं सून बाई काय म्हणता सासू बाई
कागं कागं कागं
माझा चंद्रहार घेतलास कागं
माझ्या पाटल्या घेतलास कागं
माझा शाहू घेतलास कागं
कागं कागं कागं

**ाटा :–** वाटा सगळ्या सारख्याच. प्रत्येक वाटेवर काटेही असतात आणि फुलेही असतात. मग त्या ासरच्या असोत किंवा माहेरच्या. पण गम्मत अशी आहे, की सासरहून माहेरी येताना वाटेतली फक्त ुलेच दिसतात. काटे टोचत नाहीत, आणि माहेरहून सासरी जाताना मात्र काही केल्या फुले दिसत नाहीत, र काटेच काटे लागतात. अशाच या काट्यांत हे सुंदर गीत, हे गीत 'शेवंतीचं बन' या लोकगीतांच्या ंग्रहातही आहे.

सासरच्या वाट कूचू कचू काटे
आज कोण पावणे आले गं सई आले
आज पावणी सासू आली सासू
सासूनी काय आणले गं सई सासूनी आणल्या पाटल्या
पाटल्या मी घेतनई सांगा मी येतनई
चारी दरवाजे लावा गं सई लावा
झिपरं कुत्र सोडा गं सई सोडा
सासरच्या वाट कूचू कचू काटे
आज कोण पावणे आले गं सई आले
आज पावणे सासरे आले सासरे
सासऱ्यानी काय आणलं गं सई आणलं
सासऱ्यानी आणल्या बांगड्या
बांगड्या मी घेत नई सांगा मी येत नई
चारी दरवाजे लावा गं सई
झिपरं कुत्र सोडा गं सई सोडा
सासरच्या वाट कूचू कचू काटे
आज कोण पावणे आले गं सई आले

आज पावणे दीर आले दीर
दिरानं काय आणलं गं सई आणलं
दिरानं आणला तोडा तोडा गी लेत नाई सांगा गी गेत नाई
सारी दरवाजं लावा गं सई लावा
झिपरी कुत्री सोडा गं सई सोडा
सासरच्या वाट कूचू कचू काटं
आज कोण पावणे आले गं सई आले
आज पावणे पती देव आले पती देव आले
पती देवानं काय आणलं गं सई आणलं
पती देवाने आणली साडी साडी गी नेसते सोबत गी जाते
साती दरवाजे उघडा गं बाई उघडा
झिपरं कुत्र बांधा गं बाई बांधा
सासरच्या वाट कूचू कचू काटं आज कोण पावणे आले गं सई आले
सासरच्या वाटे फुलांच्या पाकळ्या

संदर्भ :—

१) भोंडला भुलाबाई : सरोजिनी बाबर
२) लोकसंस्कृतीचे उपासक : प्रभाकर मांडे